संदर्भ क्र.सुरमं/डीए/राभाआ/२०१९-९२१.
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/०२२-२७७५१३८६,
Mail ID sgb_sanpada@yahoo.co.in

दिनांक : - ७ फेब्रुवारी २०१९

# आ दे श

## विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जानेवारी २०१९ पासून करण्यांत येणारी सुधारणा.

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/डीए/आरबीए/२०१८-६४२२, दि.१३.८.२०१८ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०१८ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/किवेअ/विभ/२०१९-०१/कार्या-१०, दि. ०४.०२.२०१९, अन्वये दि.१ जानेवारी २०१९ ते दि. ३० जून २०१९ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.४,१०४.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ०५.०२.२०१९ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जानेवारी २०१९ ते दि. ३० जून २०१९ या कालावधीकरीतां रु.४,१०४.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे.

नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०१७-७१८८, दि.१७ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

### दि.१ जानेवारी, २०१९ ते दि.३० जून २०१९ या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (मूळ वेतनाच्या @४६.७५%) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, प्रवास व शैक्षणिक भत्त्यावर, रजाकालीन प्रवास भत्ता @ ४.७५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ महिला सु.रक्षक | ७,६००.०० | ४,१०४.०० | २,३४१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १७,५४५.०० | ५,४७२.०० | २४९.०० | २३,२६६.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ७,८७५.०० | ४,१०४.०० | २,३९६.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १७,८७५.०० | ५,६००.०० | २५२.०० | २३,७२७.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ८,५७५.०० | ४,१०४.०० | २,५३६.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,७१५.०० | ५,९२७.०० | २५८.०० | २४,९००.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | ८,८००.०० | ४,१०४.०० | २,५८१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,९८५.०० | ६,०३३.०० | २६०.०० | २५,२७८.०० |
| ५ | सुरक्षा अधिकारी | ९,२५०.०० | ४,१०४.०० | २,६७१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १९,५२५.०० | ६,२४३.०० | २६५.०० | २६,०३३.०० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | ९,७००.०० | ४,१०४.०० | २,७६१.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,०६५.०० | ६,४५३.०० | २६९.०० | २६,७८७.०० |

*मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन

बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४६.७५% दराने व घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ४.७५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जानेवारी २०१९ पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guards Board For Bombay & Thane District
Sanpada
Navi Mumbai

सही/-
अध्यक्ष
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :
प्रति,
मे. ..............................................., नों.क्र. ........., युनिट क्र. .........
.........................................................

*This being a computerised printed copy, signature is not required.*

*Local/Mydoc/WGREVNOTICE 19 - 1 January 19 in Mar pg1